स्था. प्र
२६४५
२८।१।१९
सचिव

10रु. COURT FEE भारत INDIA दस रुपये TEN RUPEES Rs.10

## माहिती चा अधिकार २००५ अन्वये अर्ज

माहिती अधिकारी

माहिती अधिकारी नगरसचिव कार्यलय

मिराभाईन्दर महानगर पालिका

माहितीचा अधिकार
मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प./न.प./ज.प.
आवक क्र..०८/२०१८-१९
दिनांक:-०६/०२/२०१९

अर्जदार................................- मोहम्मद शकील शेख

पत्ता ...................................धर्ती कॉम्लेक्स ए 1-702 एवरशाइन
नगर रसाज़ स्कूल जवळ मिरारोड
मोबाइल न 9869128493

- आवश्यक असलेली माहिती चा तपशील ------- खालील प्रमाणे
- माहिती चा विषय -------- नगरसचिव विभाग
- माहिती कशा साठी पाहिजे -------- तक्रार साठी
- माहिती टपाल द्वारे,व्यक्तीशः,कसे -------- स्पीड पोस्टानी
- अर्जदार दरिद्र रेषा खिली आहे का ------- नाही,फी भरण्यास सक्षम आहे
- माहिती मिळण्याचा कालावधी -------- १५ दिवस

• (सर्व माहिती सर्टिफाय करून मिलणे)

• 1)मीरा भाईंदर महानगर पालिका ची उपविधि ला शासन मंजूरी आहे का माहिती मिळणे.
• 2)राज्य सरकार ला उपविधि कायम करण्यास कधी पाठविले होते .
• 3) उपविधि राज्य सरकारनी त्रुटी काढून परत कधी पाठविकले आणि क़ाय त्रुटि होती
• माहिती मिळणे
• 4) त्रुटी पूर्ण करुण महानगर पालिकानी परत राज्य सरकार कड़े उवविधि कायम करण्यास
• शासन मंजूरी मिळन्यास कधी पाठविले आहे सविस्तर तारीख सह माहिती मिळणे.
• ५) मीरा भाईंदर महानगर पालिका कड्रून उपविधि कायम करण्यास किती वेळा पाठपुरावा
• केला पत्र व्यवहार केले पत्र ची प्रत मिळने

दिनांक 28 जानेवरी २०१९

ठिकाण' - मीरारोड

सही

O/C

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401101

## नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ 06 /2019 दि. 06/03/2019.

प्रति,

**श्री. मोहम्मद शकील शेख**

**धर्ती कॉम्प्लेक्स, ए-702,**

**एवरशाइन नगर, रसाज स्कुलजवळ,**

**मिरारोड (पूर्व)**

**विषय :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका उपविधीबाबत माहिती मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 28 जानेवारी 2019 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज. (नगरसचिव विभागास प्राप्त दि. 06/02/2019)**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये, आपण मिरा भाईंदर महानगरपालिका उपविधीबाबत माहितीची मागणी केलेली आहे. त्यानुसार आपल्या संदर्भित पत्रात नमुद मुद्दयांची माहिती आपणांस पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| मुद्दा क्र. | माहितीचे विवरण |
|---|---|
| 1 | मिरा भाईंदर महानगरपालिका सभा कामकाज उपविधी महाराष्ट्र शासनाची अंतिम मंजुरी प्राप्त झालेली नाही. |
| 2 | दि. 17/08/2002 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका सभा कामकाज उपविधी महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीस्तव पाठविण्यात आलेली आहे. सोबत पत्राची सत्यप्रत देत आहोत. |
| 3 | दि. 14/05/2008 व दि. 10/10/2013 रोजीच्या पत्रांन्वये कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रारुप नियमांमध्ये दुरुस्ती करुन सुधारित स्वरुपात शासनाकडे सादर करणेबाबत कळविले आहे. सोबत पत्राची सत्यप्रत देत आहोत. |
| 4 | दि. 05/01/2016 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका सभा कामकाज उपविधीस मान्यता मिळणेसाठी प्रधान सचिव (2), नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना लेखी कळविण्यात आलेले आहे. सोबत पत्राची सत्यप्रत देत आहोत. |
| 5 | महानगरपालिकेमार्फत सभा कामकाज उपविधीस मान्यता मिळणेसाठी दि. 17/08/2002, दि. 02/09/2002, दि. 09/10/2002, दि. 27/06/2012 व दि. 05/01/2016 रोजीच्या पत्रान्वये महाराट्र शासनास वेळोवेळी लेखी कळविले आहे. उक्त पत्रांच्या छायांकित प्रतींची सत्यप्रत सोबत जोडून देत आहोत. |

सदर माहिती नगरसचिव विभागात, उक्त प्रकरणासंबंधी उपलब्ध मुळनस्तीवरुन देण्यात येत आहे. (एकुण पाने 07) माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

7/3/2019

6/3/19

**(कैलास दामोदर म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**नगरसचिव विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

pc 2\\Pranali\d\Mahiti Adhikar\Letter - Shakil Shaikh.docx\Letter – Shakil Shaikh

दूरध्वनी : ८१९ २८१८/८१९ ७००५/८१९ ३०२७/८१९ २५५१
फॅक्स : ८१९ ७८३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA BHAYANDAR MUNICIPAL CORPORATION

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), पिन कोड - ४०१ १०१.

जा. क्र. मनपा/सचिव/७५/४३७१/२००२-०३ दिनांक १९/०८/२००२

प्रति,

मे. सचिव,
नगरविकास विभाग,
मंत्रालय, मुंबई.

विषय :- सभा कामकाजाच्या नियमांना अंतिम मंजुरी मिळणे बाबत.

संदर्भ :- ठराव क्र. १५४, दि. ४.७.२००२.

महोदय,

वरील संदर्भीय विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका सभा कामकाजाबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुचितील प्रकरण २ नियम-१ प्रमाणे प्रारुप नियम तयार केले आहेत. या प्रारुप नियमांना महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्र. १५४, दि. ४/७/२००२ ने मान्यता दिलेली आहे. तसेच नियमांना दि. १५/०७/02 च्या दैनिक सागर दैनिकात जाहीर प्रसिध्दी दिलेली असुन, प्रसिध्दी दिलेल्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत हरकती व सुचना मागविल्या होत्या मुदतीत एकही सुचना व हरकत प्राप्त न झाल्याने ठराव क्र. १७९, दि. १८/०८/02 ने अंतिम मंजुरी दिलेली आहे. तरी या नियमांना अंतिम मंजुरी मिळणेस नम्र विनंती आहे.

आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

पत्रा सोबत-
दि. ४.७.२००२ रोजीचा ठराव क्रमांक १५४ व दैनिक सागर या दैनिकात प्रसिध्द केलेली नोटीस.

सचिव
नगरविकास विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**महाराष्ट्र शासन**

**क्रमांकः-** मिभामपा-११०८/१७९/
प्र.क्र.१४/०८/नवि-२८
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांकः- ९/१५/०८

**प्रति,**

आयुक्त,
मिरा-भाईंदर महानगरपालिका,
जिल्हा-ठाणे.

**विषयः-** मिरा-भाईंदर महानगरपालिका सभा कामकाज नियमांना मंजूरी देण्याबाबत.

**संदर्भः** आपली १) क्र.मनपा/साशा/४५/४३७१/२००२-०३, दि.१७/०८/२००२.
२) क्र.मनपा/प्रअ/३४/४९१०/२००२-०३, दि.०२/०९/२००२ ची पत्रे.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने तयार केलेले सभा कामकाज प्रारुप नियम दि.१६/०२/२००२ च्या राजपत्रात प्रसिद्ध झाले आहेत. त्यानंतरच्या कालावधीत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये झालेल्या सुधारणा तसेच शासनाने केलेले नियम विचारात घेऊन अद्ययावत तरतूदी आणि नियमानुसार प्रारुप नियमांमध्ये दुरुस्ती करुन सुधारित स्वरुपात प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर करावा.

आपली,

(उ. सं. दांडेकर)
कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग

ISSUED
Date ९/१५/०८

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

F:\Lotus-Ud-28 Mira-bhayandar

मिरा-भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
आ. क्र. ३९८
दिनांक ११/१०/१३

## महाराष्ट्र शासन

**क्रमांकः-** मिभाम-११०८/१७९/
प्र.क्र.१४/०८/नवि-२८
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांकः-** १० /१०/२०१३.

**प्रति,**

आयुक्त,
मिरा-भाईंदर महानगरपालिका,
जिल्हा - ठाणे.

| नगरसचिव विभाग | |
|---|---|
| स.प./न | ८८ २०१३-१४ |
| दिनांक : १८/१०/१३ | |

**विषयः-** मिरा-भाईंदर महानगरपालिका सभा कामकाज नियमांना मंजूरी देण्याबाबत.

**संदर्भः-** आपली १) मनपा/साशा/४५/४३७१/२००२-०३, दि.१७/०८/२००२.
२) क्र.मनपा/प्रअ/३४०/४९१०/२००२-०३, दि.०२/०९/२००२ ची पत्रं.
३) शासन पत्र समक्रमांक दि.१४/०५/२००८.

सचिव

आयुक्त महोदय, मिरा-भाईंदर महानगरपालिका

उपरोक्त विषयावरील आपल्या संदर्भीय क्र.१ व २ येथील पत्रांन्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.३ येथील शासन पत्रान्वये सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर शासन पत्राचे कृपया अवलोकन व्हावे. (प्रत संलग्न)

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने तयार केलेले सभा कामकाज प्रारुप नियम दि.१६/०२/२००२ च्या राजपत्रात प्रसिद्ध झाले आहेत. त्यानंतरच्या कालावधीत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये झालेल्या सुधारणा तसेच शासनाने केलेले नियम विचारात घेऊन अद्ययावत तरतूदी आणि नियमानुसार प्रारुप नियमांमध्ये दुरुस्ती करुन सुधारीत प्रस्ताव आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास सादर करावा, ही विनंती.

आपला,

( आर. एम. परदेशी )
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**सोबतः-** वरीलप्रमाणे.

प्रत : उ.स. (नवि-२८) यांचे स्वीय सहायक

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली साक्षांकित सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\ud-28 (New)\UD-28 25 may, 2010\Mira-Bhayandar Letters MBMC-1.lwp

दूरध्वनी: २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८९३०१ / ...
फॅक्स: २८१९...

मिरा - भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय भाईंदर
MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
स्व.इंदिरागांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प), ता.जि.ठाणे-४०११०१.

जा.क्र. मनपा / सचिव / २४३ / २०१५-१६   दिनांक : ०५/०१/२०१६

प्रति,
मा. प्रधान सचिव (२)
नगरविकास विभाग (नवि-२८)
मंत्रालय, मुंबई - ३२.

आवक दि. ५-१-१६

विषय :- प्रारुप सभा कामकाज नियमांना अंतिम मंजूरी मिळणेबाबत.

संदर्भ :- १) या कार्यालयाकडील पत्र क्र. मनपा/साशा/४५/४३७१/२००२-०३, दि.१७/०८/२००२.
२) या कार्यालयाकडील स्मरणपत्र क्र. मनपा/प्र.अ./३४०/४९१०/२००२-०३, दि. ०२/०९/२००२.
३) या कार्यालयाकडील स्मरणपत्र क्र.१ मनपा/सचिव/प्र.स./१४९/६०४७/२००२-०३, दि. ०९/१०/२०१२.
४) या कार्यालयाकडील पत्र क्र. मनपा/सचिव/३३/२०१२-१३ दि. २७/०६/२०१२.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार, मिरा भाईंदर महानगरपालिका सभा कामकाजाबाबत अधिनियमातील अनुसुची प्रकरण २ नियम १ प्रमाणे प्रारुप सभाकामकाज नियम तयार करुन संदर्भित पत्रान्वये, अंतिम मान्यतेसाठी आपणांकडे अग्रेसित करण्यांत आले होते. परंतु सभा कामकाज नियमांना अंतिम मान्यता प्राप्त झालेली नाही. सभा कामकाज नियमांना अंतिम मान्यता प्राप्त नसल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका सभागृहात सभेचे कामकाज कोणत्या नियमा अंतर्गत चालते यासंबंधी पालिका सदस्य नेहमी विचारणा करीत असतात.

तरी कृपया सभाकामकाज नियमांना अंतिम मंजूरी मिळणेस नम्र विनंती आहे.

आपला विश्वासू,

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :-
संदर्भिय पत्र व प्रारुप उपविधीची प्रत .

E:\01 Backup 02\1 D\01 My Document\01 Nagar Sachiv\Letter - Pradhan Sachiv123.doc

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

MIRA BHAYANDAR MUNICIPAL CORPORATION

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), पिन कोड - ४०१ १०१.

जा. क्र. मनपा/प्र/३४०/१९७०/२००२-०३ दिनांक 2/9/2002

प्रति,

मा.उपसचिव सो.

नगरविकास विभाग,

मंत्रालय मुंबई.-32

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका सभा कामकाज उपविधीबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाकडील दि. १५/८/२००२ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सभा कामकाज उपविधी तयार करणेत आलेली आहे. सदर उपविधी तपासून, दुरुस्त करुन पुढील कार्यवाही करिता यापत्रासोबत जोडून आपल्याकडे पाठवित आहोत. कळावे, हि विनंती.

आपला विश्वासू

आयुक्त,

मिरा भाईंदर महानगरपालिका

दि. 3/9/2002

माहिती अधिकार २००५ अंतर्गत

जन माहिती अधिकारी

नगरविकास विभाग

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA BHAYANDAR MUNICIPAL CORPORATION

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि. ठाणे - ४०१ १०१.

मनपा/प्र-अ/११९/६०३७/2002-2003 दिनांक ९/१०/2002

## स्मरणपत्र - १

प्रति,
मा.सचिव सो.
नगरविकास विभाग
मंत्रालय मुंबई.-३२

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका सभा कामकाज नियम उपविधी मंजूरी बाबत..

संदर्भ :- इकडील पत्र क्र.

१) मनपा/साशा/४५/४३७१/२००२-०३,दि.१७/८/२००२

२) मि.भा.मनपा/प्र.अ/३४०/४९१०,२००२-०३, दि.२/९/२००२

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सभा कामकाजा बाबत नियम, उपविधी तयार करणेत आलेले असून परील संदर्भिय पत्रानुसार आपलेकडे मंजूरी करिता पाठविलेले आहेत. सदर उपविधीस मंजूरी न मिळाल्याने प्रशासनास अडचण निर्माण होत आहे. तरी सदर उपविधीस त्वरित मंजूरी मिळावी हि विनंती.

आपला विश्वासू,

आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत

जन माहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

01८

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८१९८३ / २८१८११४३ / २८१८१९८०
फॅक्स : २८११७०३३

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व.इंदिरागांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प), ता.जि.ठाणे-४०११०१.

जा. क्र. मनपा/सचिव/33/2012-13 दिनांक : २७/६/२०१२.

प्रति,
मा. कक्ष अधिकारी सो.,
नवि-२८, मंत्रालय,
मुंबई - ४०००३२

**विषय :-** सभा कामकाजाबाबत तयार केलेले प्रारुप उपविधीस मंजूरी मिळणेबाबत.

**संदर्भ :-** दि. २१/०६/२०१२ रोजी मंत्रालयास लागलेल्या आगीच्या दुर्घटनेबाबत आपले दि. २२/०६/२०१२ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार कळविण्यांत येते की, महानगरपालिकेशी निगडीत कामकाज इत्यादी बाबत शासनासोबत ह्यापूर्वी झालेल्या विषयांकित पत्रव्यवहाराची माहिती (छायांकित प्रत व सॉफ्ट कॉपी सी.डी.) सोबत जोडून देत आहे.

सी.डी. मिळाली नाही
26/6/2012

प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका